नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १३/१२/२०२५ ( शनिवार )

# अवैधरित्या अंमली पदार्थ एम.डी ( मेफेड्रोन पावडर) ची वाहतुक करणाऱ्या अरोपीतांवर गुन्हा नोंद, २ आरोपी अटक नागपुर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**पोस्टे कन्हान** :—दिनांक १२/१२/२०२५ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक पेट्रोलींग करीत असतांना नागपूर ते जबलपूर महामार्गाने रामटेक कडे जात असतांना कन्हान नदीचे पुलावर एक ग्रे रंगाची मारुती सुझुकी सेलेरिओ कंपनीची कार क्र. एम एच ३१/ ई ए ६७१६ ही थांबुन दिसली. संशयित कार पोलीस वाहनास पाहुन सुसाट वेगाने निघुन गेली. त्यामुळे सदर गाडीमध्ये नक्कीच काहीतरी संशयास्पद असल्याचा पथकास संशय आल्याने सदर वाहनाचा पाठलाग करुन सदर वाहनास शिताफीने बोरडा टोल प्लाझा, कन्हान येथे थांबवुन नमुद वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता वाहन चालक आरोपी १) **विजय नंदलाल रहांगडाले, वय ४२ वर्ष, रा. वार्ड क्र. २, संघर्ष नगर, स्वामी नारायण मंदिरा जवळ वाठोडा, जि. नागपुर** आणि एक महिला आरोपी हे मिळुन आले. पोलीसांनी वाहनाची तसेच आरोपीची झडती घेतली असता नमुद झडतीत एम. डी ( मेफेड्रोन पावडर) हा अंमली पदार्थ मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष १) एम. डी ( मेफेड्रोन पावडर) वजन १३.५६ ग्रॅम किंमती ६७,८०० /— रुपये २) गुन्हयात वापरलेली मारुती सुझुकी सेलेरिओ कार क्र. एम एच ३१ ई ए —६७१६ किंमती ६,००,०००/—रूपये , ३) तीन मोबाईल किंमती ३०,०००/—रूपये आणि रोख रक्कम ७०० /— रूपये असा एकुण ६,९८,५००/— रूपयांचा मुद्देमाल आरोपीतांकडुन जप्त करण्यात आला आहे.

नमुद प्रकरणी आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे  एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. आरोपी क्र. १ हा नागपुर शहरातील रहीवाशी असुन तो नागपुर शहरात आणि नागपुर जिल्हयात आजुबाजुच्या भागात अंमली पदार्थ  एम. डी  ( मेफेड्रोन  पावडर) चा  पुरवठा करीत असल्याची माहीती पोलीसांना तपासादरम्यान प्राप्त झाली असुन पोलीस साखळी पुरावे जोडुन सदर गुन्हयात मुख्य पुरवठादार आणि माल विकत घेणारे याबाबत सखोल तपास करीत आहेत.



# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६५४ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १३/१२/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ६५४ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २५ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३६ आरोपी अशा एकुण १२७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे २७ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण १२० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २८ आरोपी अशा एकुण ५८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २७ आरोपी आणि

पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २५ आरोपी अशा एकुण ११६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ३९ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३८ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३० आरोपी अशा एकुण १३७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६५४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**






## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणारे आरोपीतांविरूद्ध ०२ गुन्हे नोंद

दिनांक १२/१२/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण १३४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस स्टेशन अरोली येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन खापा येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण ०२ गुन्हे नोंद केले आहे.

**सदर कारवाईत २१६० मिली देशी दारु, ०५ लीटर मोहाफुल दारू असा एकुण १३४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचनामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने